महाराष्ट्र पोलीस
सदरक्षणाय खलनिग्रहणाय

जनसंपर्क अधिकारी कार्यालय
ठाणे शहर आयुक्तालय,जि ठाणे यांचे कार्यालय
पोलीस उपआयुक्त कार्यालय परीमंडळ ०३,कल्याण ठाणे शहर
दुरध्वनी:—९८१९०२८२७९
ई—मेल:— cp.thane.pro@mahapolice.gov.in

प्रेस नोट दिनांक : १५/१२/२०२५

'' जुन्या वादातुन आरोपींनी कोयत्याने, चाकुने व लोखंडी रॉडने मयतांचे अंगावर ४० वार करून खुन करून पळुन गेलेल्या आरोपीतांना १२ तासात पकडले.''

डोंबिवली पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रात दि. १३/१२/२०२५ रोजी रात्रौ ११:३० वा. चे सुमारास आर.के. एन्टरप्राईजेस, कोपर स्टेशन जवळ, डोंबीवली पूर्व येथे यातील आरोपीतांनी आपसांत संगनमत करून जुन्या भांडणाच्या कारणावरून नरेंद्र उर्फ काल्या जाधव याला '' तु यहा क्यू आया, अब यहाँ से तुमको जाने नही देंगे, तुझे यही खतम कर देंगे, देखते है तुमको कौन बचाने आता है । '' असे बोलुन शिवीगाळी, दमदाटी करून चाकू, कोयता आणि लोखंडी रॉडने त्याचे डोक्यावर, मानेवर, गळयावर, छातीवर, पोटावर, पाठीवर, हातापायांवर असे एकुण ४० वार करून त्यास जीवे ठार मारले आहे. तसेच त्याला वाचविण्यासाठी फिर्यादी हे मध्ये गेले असता आकाश बिराजदार याने त्यांना शिवीगाळी करून '' तु बीच मे आया तो तुझे खतम कर देंगे । '' अशी दमदाटी करून त्यांचे डोक्यावर चाकूने वार करून व इतरांनी हाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्याप्रमाणे दाखल गुन्हयातील फिर्यादी नामे शुभम राजेश पांडे, वय- २७ वर्षे, धंदा- बेरोजगार, राह. रूम नं ०५ चाळ नं ०५ ओम साई सिध्दी चाळ, बालाजी गार्डनच्या मागे, विसर्जन तलावाच्या बाजुला, आयरे गांव, डोंबिवली पुर्व, मो नं ९३७२६७६०४१ हकिकत सांगितल्याने तसा जबाब नोंदवुन डोंबिवली पोलीस स्टेशन । ८९८ /२०२५ भारतीय न्याय सहिंता २०२३ चे कलम १०३,१०९,११५(२),३५२,३५१(२),३(५) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१),१३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

दाखल गुन्हयातील आरोपी नामे १) आकाश बिराजदार, २) गुप्ता पुर्ण नांव माहित नाही, ०१ अनोळखी इसम आणि ०१ अनोळखी महिला यांचे शोध घेणे कामी पोलीसांचे तात्काळ तपास स्वंतत्र पथक तयार करून आरोपीचा शोधे व योग्य तपास करणे बाबत मा. पोलीस उप आयुक्त, सो। परिमंडळ ३, कल्याण व मा. सहा. पोलीस आयुक्त, सो. डोंबिवली विभाग सुचना दिल्या. त्याप्रमाणे एका पथकांने घटनास्थळा लगत असलेले सीसीटीव्ही कॅमे-यांची पाहणी केली. त्यादरम्यान दाखल गुन्हयातील मुख्य आरोपी नामे १) आकाश बिराजदार, हा घटनास्थळ जवळच राहत असल्याची माहिती मिळाल्याने सदर आरोपीचा शोध घेणेकामी सदर ठिकाणी धाव घेतली. सदर ठिकाणी आरोपी राहत असुन त्यांचे घरास लॉक होते. आजुबाजुस राहणा-या लोकांकडे आरोपी बाबत विचारपुस करता त्यांना आरोपीबाबत काहीएक

माहित नसल्याचे सांगितले. तसेच सदर आरोपी यांचेकडे मोबाईल नसल्याचे देखील सांगितले. सदर तपासात आरोपी यांची पत्नी व दाखल गुन्हयातील त्यांचा साथिदार यांचा मोबाईल क्रमांक प्राप्त झाले. सदर मोबाईलचे अनुषंगाने आरोपीचा शोध घेतला असता सदर आरोपी महिला ही अंबरनाथ येथे असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने तपास पथक व महिला अंमलदार असे सदर ठिकाणी रवाना केले. सदर ठिकाणी तपासात आरोपी महिला मिळुन आली असुन तीचेकडे मुख्य आरोपी नामे आकाश बिराजदार यांचेबाबत विचारपुस करता तीने काहीएक उपयुक्त माहिती दिली नाही. परंतु तो त्यांचे आईच्या घरी उल्लासनगर ३ येथे असण्याची शक्यता होती म्हणुन

प्राप्त माहितीचे आधारे दाखल गुन्हयातील मुख्य आरोपी आकाश बिराजदार यांचे आईचे घरी शोध घेतला परंतु आरोपी मिळुन आला नाही. तसेच सदर ठिकाणी प्राप्त मोबाईल क्रमांकाचे आधारे तांत्रिक तपासात आरोपी व त्यांचा साथिदार हे दिवा वेस्ट येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने दिवा वेस्ट येथे आरोपीचा शोध घेतला असता सदर ठिकाणी दाखल गुन्हयातील मुख्य आरोपी १) **आकाश गौरीशंकर बिराजदार,वय - २९ वर्षे** व त्यांचा साथिदार नामे २) दिवाकर महेशचंद्र गुप्ता, वय - १८ वर्षे, ३) आलिफ शहादाब खान, वय - १८ वर्षे यांना अटक करण्यात आले आहे.

दाखल गुन्हयाचे तपासात मुख्य आरोपी आकाश गौरीशंकर बिराजदार
यांने फिर्यादी व दाखल गुन्हयातील मयत इसम नरेंद्र जाधव यांचे पुर्व वैमन्यास्यतुन कोयत्याने, चाकुने मयतांचे शरिरावर ४० वार करुन नरेंद्र उर्फ काल्या भाई भालचंद्र जाधव वय ३७ वर्षे यास ठार मारले. तसेच फिर्यादी शुभम राजेश पांडे, वय- २७ वर्षे, यास गंभीर जखमी केले. दाखल गुन्हयाचा अधिक तपास चालु आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर श्री.आशुतोष डुंबरे सो, मा. सह पोलीस आयुक्त, श्री. ज्ञानेश्वर चव्हाण सो, मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. संजय जाधव सो, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -३, कल्याण श्री. अतुल झेंडे सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डोंबिवली विभाग श्री. सुहास हेमांडे सो, यांचे मार्गदर्शनाखाली डोंबिवली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गणेश जवादवाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे)/राजेंद्र खेंडकर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनिरी/प्रसाद चव्हाण, पोहवा/१९२४ सुनिल भणगे, पोहवा /६८१७ देवीदास चौधरी, पोशि/३४०६ शिवाजी राठोड, पोशि/३९९८ निलेश पाटील, पोशि/२०२६ ज्ञानेश्वर शिंदे, पोशि/६१०२ राजेंद्र सोनवणे, पोशि/२७३७ सचिन वरठा, मपोअं/७४१९ वेणु कळसे
सदर गुन्हयाचे तपासात मदत करणारे अधिकारी व अंमलदार सपोनि/ईश्वर कोकरे, सपोनि/शहाजी नरळे, सपोनि/ प्रविण घुटुकडे, सपोउपनिरी/ पाटणे, पोहवा/६४७३ महेंद्र धुमाळ, पोहवा./२०१२ निसार पिंजारी, पोअं/२६८९ जयपाल मोरे, पोअं/३९०९ अजय बागुल, पोहवा/६८७२ सुभाष बांभळे, पोअं/१५४८ दिपक ननावरे, पोअं/५०१ शेखर कदम यांनी मदत केली.